Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास

**डॉ गजानन मुरलीधर खेकाडे**
सहायक प्राध्यापक, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरपूर

**डॉ तुषार मधुकर माळी**
सहायक प्राध्यापक, आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरपूर

**सारांश**

प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाविषयी असलेली अभिरुची समजून घेणे, अभिरुची निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रम राबविणे व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे हा होता. या प्रायोगिक संशोधनात पूर्व-उत्तर चाचणी अभिकल्प वापरण्यात आला. नमुन्यात आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर येथील 30 बी.एड. छात्रअध्यापकांचा समावेश करण्यात आला. संशोधकाने स्वतः तयार केलेल्या कृती संशोधन अभिरुची चाचणी साधनाचा वापर करून पूर्व चाचणी व उत्तर चाचणीद्वारे माहिती संकलित करण्यात आली. माहितीचे विश्लेषण मध्यमान, प्रमाण विचलन व ‘t’ मूल्य यांच्या साहाय्याने करण्यात आले. सांख्यिकीय विश्लेषणानुसार, df = 58 साठी 0.05 स्तरावर नमुना ‘t’ मूल्य 2.00 असताना, प्राप्त t मूल्य 5.15 होते, जे अत्यंत लक्षणीय आहे. उत्तर चाचणीचे मध्यमान (33.45) हे पूर्व चाचणीच्या मध्यमानापेक्षा (25.63) जास्त असल्यामुळे शून्य परिकल्पना नाकारण्यात आली. यावरून स्पष्ट होते की, अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीमुळे बी.एड. छात्रअध्यापकांच्या कृती संशोधनाविषयीची अभिरुची लक्षणीयरीत्या वाढली.

**प्रस्तावना-**

अध्यापन व्यवसाय हा केवळ ज्ञानदानाचा नव्हे, तर एक प्रेरणादायी, मूल्याधिष्ठित आणि सतत विकासाचा मार्ग आहे. कोणत्याही व्यक्तीस शिक्षक होण्यासाठी केवळ अध्यापनाची आवड पुरेशी नसते, तर त्यासाठी आवश्यक असते विशिष्ट सेवापूर्व प्रशिक्षण. भारतामध्ये बी.एड. (B.Ed.) किंवा डी.एड. (D.Ed.) सारखे प्रशिक्षण अभ्यासक्रम शिक्षकांच्या व्यावसायिक सक्षमीकरणासाठी अनिवार्य समजले जातात. या अभ्यासक्रमांद्वारे शिक्षकांना अध्यापनशास्त्र, विविध शैक्षणिक सिद्धांत, मूल्यशिक्षण तसेच सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते, जे त्यांना भावी अध्यापनाच्या आव्हानांसाठी सक्षम करते. बी.एड.

अभ्यासक्रमामध्ये 'आंतरवासिता उपक्रम' हा एक महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. या टप्प्यात छात्र-अध्यापकांना प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन अध्यापनाचा अनुभव मिळतो. या काळात त्यांना विद्यार्थ्यांच्या विविध गरजा समजून घेणे, अध्यापन कौशल्यांचा वापर करणे आणि शाळेतील कार्यसंस्कृतीशी समरस होणे अपेक्षित असते. या प्रक्रियेत 'कृती संशोधन' (Action Research) हे एक आवश्यक प्रात्यक्षिक घटक असतो, जो अध्यापनात येणाऱ्या समस्यांचे विश्लेषण करून त्या समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यास मदत करतो.

बी.एड. अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला आंतरवासिता उपक्रम सुरु झाल्यामुळे अनेक छात्र-अध्यापकांना कृती संशोधन यासारख्या प्रात्यक्षिकांचे सखोल आकलन होण्यास मर्यादा येतात. अशा परिस्थितीत, 'कृती संशोधन' हा घटक त्यांच्या सैद्धांतिक समजुतीपासून दूर राहतो व ते केवळ औपचारिकता म्हणून पूर्ण केलं जातं. या अडचणीच्या समाधानासाठी संशोधकाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या COCC (Career Oriented Certificate Course) कोर्सेस अंतर्गत "Certificate Course in Action Research for Teacher Trainees" हा अभ्यासक्रम सुरु केलेला आहे. या कोर्सचा मुख्य उद्देश म्हणजे बी.एड. छात्र-अध्यापकांना कृती संशोधनाची सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक तयारी करून देणे, जेणेकरून आंतरवासिता उपक्रमादरम्यान ते या घटकाला अधिक आत्मविश्वासाने आणि परिणामकारकतेने हाताळू शकतील. या अभ्यासक्रमातून केवळ तांत्रिक कौशल्यच नव्हे, तर शैक्षणिक समस्यांविषयीची निरीक्षणक्षमता, विश्लेषणात्मक दृष्टी आणि समस्यांवर संशोधनाधारित उपाय शोधण्याची तयारी विद्यार्थ्यांमध्ये विकसित केली जाते.

संशोधनाचा मुख्य उद्देश म्हणजे या कोर्समुळे बी.एड. छात्र-अध्यापकांमध्ये 'कृती संशोधन' विषयाबाबत अभिरुचीमध्ये काही सकारात्मक फरक झालाय का, हे शोधणे. यासाठी संशोधकाने कोर्सला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कोर्सपूर्व व कोर्सनंतर 'कृती संशोधन अभिरुची चाचणी' घेतली. या चाचणीच्या माध्यमातून कृती संशोधनाबद्दल त्यांची आवड, समज, आणि सक्रिय सहभाग यामध्ये झालेला बदल अभ्यासला गेला. हे कृती संशोधन आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्रवेशित "Certificate Course in Action Research for Teacher Trainees" च्या विद्यार्थ्यांवर राबवण्यात आले. या संशोधनामध्ये कृती संशोधन अभ्यासक्रमाच्या प्रभावाचा वैज्ञानिक विश्लेषण करून त्याच्या शैक्षणिक परिणामकारकतेचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**समस्या विधान:**

शिरपूर शहरातील बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची (Certificate Course in Action Research for Teacher Trainee) अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे:**

1. बीएड छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधना विषयी असलेल्या अभिरुचीचा अभ्यास करणे.
2. बीएड छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणे.
3. बीएड छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविल्यानंतर परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

1. बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासंदर्भातील दिलेली पूर्व चाचणी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंमलबजावणी केल्यानंतरच्या दिलेल्या उत्तर चाचणीच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही.

**संशोधन कार्यपद्धती**

| | |
|---|---|
| **संशोधन पद्धती** | प्रायोगिक संशोधन पद्धती |
| **प्रायोगिक अभिकल्प** | पूर्व-उत्तर चाचणी एकलगट अभिकल्प |
| **न्यादर्श** | आर सी पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिरपूर येथे सुरु Certificate Course in Action Research for Teacher Trainee या अभ्यासक्रमास प्रवेशित एकूण 30 विद्यार्थी |
| **साधने** | स्वनिर्मित कृती संशोधन अभिरुची चाचणी<br>विधाने – 30, सहमत, असहमत, सांगता येत नाही |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे** | मध्यमान, प्रमाण विचलन व t मूल्य |

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन**


प्रस्तुत संशोधनात, संशोधक हे Certificate Course in Action Research for Teacher Trainee चे समन्वयक असून त्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्वनिर्मित कृती संशोधन अभिरुची चाचणी ही पूर्व चाचणी दिली त्यानंतर अभ्यासक्रम 45 दिवसाच्या कालावधीत राबविला त्यानंतर

पुन्हा संशोधकाने स्वनिर्मित कृती संशोधन अभिरुची चाचणी ही उत्तर चाचणी दिली, त्यांनतर गुणदान केले व खालील परिकल्पना परीक्षण केले.

1. **बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासंदर्भातील दिलेली पूर्व चाचणी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंमलबजावणी केल्यानंतर दिलेल्या उत्तर चाचणीच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येत नाही.**

**सारणी क्रमांक 01**

| कृती संशोधना अभिरुची | N | (M) | (SD) | Table 't' | Obtained 't' | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | 30 | 25.63 | 5.78 | 2.00 | 5.15 | त्याग |
| उत्तर चाचणी | 30 | 33.45 | 5.96 | | | |




**आलेख क्रमांक 01**

**निरीक्षण व अर्थनिर्वचन:** स्वाधीनता मात्रा (df) 58 साठी 0.05 सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणीनुसार नमुना 't' मूल्य 2.00 आहे व प्राप्त 't' मूल्य 5.15 असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासंदर्भातील दिलेली पूर्व चाचणी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंमलबजावणी केल्यानंतर दिलेल्या उत्तर चाचणीच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येतो. बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुचीच्या उत्तर चाचणीचे मध्यमान पूर्व चाचणी पेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता

येईल की, Certificate Course in Action Research for Teacher Trainee या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी मुळे विद्यार्थ्यांच्या कृती संशोधनाच्या अभिरुचीत वृद्धी झाली.

**निष्कर्ष**

1. बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासंदर्भातील दिलेली पूर्व चाचणी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम अंमलबजावणी केल्यानंतर दिलेल्या उत्तर चाचणीच्या माध्यमान गुणांकात सार्थ फरक दिसून येतो. बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुचीच्या उत्तर चाचणीचे मध्यमान पूर्व चाचणी पेक्षा अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, Certificate Course in Action Research for Teacher Trainee या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणी मुळे विद्यार्थ्यांच्या कृती संशोधनाच्या अभिरुचीत वृद्धी झाली.

**निष्कर्षावर आधारीत चर्चा**

या संशोधनात बी.एड. छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाची अभिरुची निर्माण करण्यासाठी "Certificate Course in Action Research for Teacher Trainees" या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली. या अभ्यासक्रमाच्या परिणामकारकतेची तपासणी करण्यासाठी पूर्व चाचणी व उत्तर चाचणी पद्धतीचा वापर करण्यात आला. प्राप्त आकडेवारीनुसार, पूर्व चाचणी व उत्तर चाचणीच्या माध्यमान गुणांकात लक्षणीय फरक दिसून आला आहे. प्राप्त 't' मूल्य 5.15 हे संख्याशास्त्रीय सारणीनुसार df = 58 साठी 0.05 सार्थकता स्तरावरील संकल्पित t-मूल्य 2.00 पेक्षा जास्त असल्यामुळे, शून्य परिकल्पना त्याग करण्यात आली. यावरून असे स्पष्ट होते की अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केल्यानंतर छात्रअध्यापकांच्या कृती संशोधनाविषयी अभिरुचीत सकारात्मक वाढ झाली. उत्तर चाचणीचे मध्यमान गुणांक पूर्व चाचणीपेक्षा अधिक असल्यामुळे हे सिद्ध होते की अभ्यासक्रमाने छात्रअध्यापकांमध्ये कृती संशोधनाच्या संकल्पना, प्रक्रियेची समज, व त्यातील सहभाग वाढवण्यात यश मिळवले. या निष्कर्षांवरून पुढील गोष्टी लक्षात येतात: अभ्यासक्रमाने कृती संशोधनाविषयी छात्रअध्यापकांमध्ये आत्मविश्वास, उत्सुकता व शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी संशोधनात्मक दृष्टिकोन वाढवण्यास मदत केली. कृती संशोधनासारखी संकल्पना अध्यापन प्रशिक्षणात सक्रिय व प्रभावीपणे शिकविल्यास, भविष्यात शिक्षकांकडून शाळेतील समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न अधिक होईल.अभ्यासक्रमात कृती संशोधनासंबंधी प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश करणे ही एक प्रभावी पद्धत ठरू शकते.

**ग्रंथसूची**

आगलावे, प्रदीप. (2000) . *संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे,* नागपूर: विद्या प्रकाशन.

घोरमोडे, के. यु., घोरमोडे, कला, (2008). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे,* नागपूर: विद्या प्रकाशन.

भितांडे, वि. रा. (2007*). शैक्षणिक संशोधन पद्धती. (प्रथम आवृत्ती*). पुणे: नित्यनूतन प्रकाशन.

मुळे व उमाठे. (1998). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. (तिसरी आवृत्ती).* नागपूर: विद्या बुक्स प्रकाशन.